सकाळ

# काळाची हाक म्हणून मराठी भाषा-संस्कृती सांभाळा : विश्वास पाटील

## तळेगाव दाभाडे येथील परिसंवादात 'लोकरंगभूमी आणि अभिजात मराठी'चा जागर

**तळेगाव स्टेशन, ता. २९ :** "आज महाराष्ट्र अस्वस्थ आहे. आमच्या मराठी भाषेवर, मुंबईवर वेगवेगळ्या क्षेत्रातल्या बादशहांची नजर पडते आहे. या कठीण काळात लेखक, कलावंत आणि सर्वांनी आपली मराठी भाषा, संस्कृती सांभाळायला हवी," असे आवाहन ज्येष्ठ कादंबरीकार विश्वास पाटील यांनी केले.

भारत सरकार संस्कृती मंत्रालय साहित्य अकादमी आणि इंद्रायणी महाविद्यालय यांच्या विद्यमाने तळेगाव दाभाडे येथील यशोदा महादेव काकडे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये 'लोकरंगभूमी आणि अभिजात मराठी' विषयावरील परिसंवादाचे शनिवारी (ता.२८) आयोजन करण्यात आले होते. रिद्धपूर-अमरावती येथील मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू अविनाश अवलगावकर यांच्या हस्ते परिसंवादाचे उद्घाटन झाले. नाट्य दिग्दर्शक पद्मश्री वामन केंद्रे, लोककलेचे अभ्यासक डॉ. प्रकाश खांडगे, इंद्रायणी विद्या मंदिर संस्थेचे कार्यवाह चंद्रकांत शेटे, निरुपा कानिटकर, प्राचार्य डॉ. संभाजी मलघे आदी विचारपीठावर उपस्थित होते. डॉ. गणेश चंदनशिवे यांनी गायलेल्या महाराष्ट्र गौरव गीताने परिसंवादास सुरुवात झाली. साहित्य अकादमीचे प्रभारी अधिकारी ओम प्रकाश नागर यांनी स्वागत केले. प्राचार्य डॉ. मलघे यांनी प्रास्ताविक केले.



**तळेगाव दाभाडे :** साहित्य अकादमीच्या लोकरंगभूमी आणि अभिजात मराठी विषयावरील परिसंवादात बोलताना विश्वास पाटील. व्यासपीठावर कुलगुरू अविनाश अवलगावकर, पद्मश्री वामन केंद्रे, डॉ. प्रकाश खांडगे आणि मान्यवर.

डॉ. खांडगे म्हणाले, "शास्त्रकुत नामाभिमान मिळाल्यानंतर भाषा अभिजात होते. अभिजात मराठी भाषेला ऊर्जा देण्याचे काम बोलीभाषा करतात. लोकरंगभूमीवरील अभिजात मराठी भाषा ही उत्स्फूर्त, पारंपरिक, लवचिक, प्रवाही बोलीभाषा असते. प्रमाणभाषेपेक्षा ती वेगळी असते."

अवलगावकर म्हणाले, "लोकसाहित्याच्या आदीम व्यवस्थेमध्ये मराठी भाषेचे मूळ शोधता येते. मराठी लोकसाहित्य हेच मूळ साहित्य आहे. आदीम जमातीचे नृत्य हे लोकरंगभूमीचे पहिले पाऊल होय. कीर्तन परंपरेचे लोकरंगभूमीशी जुने नाते आहे. सगळ्या कलांची भूमी ही लोकभाषा आहे. अभिजात मराठी भाषेचा इतिहास हा लोकभाषेत शोधावा लागतो."

केंद्रे म्हणाले, प्रयोगरुपाने अविष्कारीत होणारी भाषा म्हणजे रंगभाषा होय. लोकरंगभूमीवरील भाषेची क्षमता ही नाटक आणि सिनेमापेक्षा वेगळी आहे. हेच तिचे बलस्थान आहे. नेपथ्य नसताना लोकरंगभूमीवर प्रसंगानुरूप अवतरणारी ती रंगभाषा होय." चर्चासत्राच्या पहिल्या सत्रात मुकुंद कुळे यांचे विधिनाट्याची रंगभाषा आणि अभिजात मराठी तसेच संतोष शेणई यांचे भक्तीनाट्याची रंगभाषा आणि अभिजात मराठी या विषयावरील निबंध वाचन झाले. अध्यक्षस्थानी अनिल सहस्रबुद्धे होते. दुसऱ्या सत्रामध्ये प्रभाकर ओव्हाळ यांचे वगनाट्याची रंगभाषा आणि अभिजात मराठी, सोपान खुडे यांचे लोकनाट्याची रंगभाषा आणि अभिजात मराठी आणि डॉ. गणेश चंदनशिवे यांचे 'तमाशाची रंगभाषा आणि अभिजात मराठी' या विषयावरील निबंध वाचन झाले.

प्रा. सत्यजीत खांडगे यांनी सूत्रसंचालन, उपप्राचार्य संदीप भोसले यांनी आभार मानले. प्राचार्य डॉ. साहेबराव पाटील यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी आदींनी नियोजन केले.

Pune, PCMC-Today
30/06/2025 Page No. 8